"श्री त्र्यंबकेश्वर प्रसन्न ''

श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथिल उपाध्याय
**सांभ शंकर शिखरे**(*पवईकर*)
**भ्रमणदुरध्वनी** = ९४२२२६८५९६ **भूषण सांभ शिखरे**(*ज्योतिष पंडित*)
**FAX** = (०२५९४)२३३६४६ **ग्रहसंकेत ज्योतिष कार्यालय** (*कृष्णमूर्ती सिध्दांतावर आधारित*)
**पत्ता** = ४१७,**"ग्रहसंकेत"**,सत्यनारायण मंदिराजवळ मु.पो.ता. श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर,जि.नाशिक. ४२२२१२ महाराष्ट्र

(०२५९४)२३३०१४ फोनची वेळ = दुपारी २ ते ५ फक्त व रात्री ८ ते १० फक्त, भेटण्याची वेळ दुपारी २ ते ५ फक्त

www.shikharebs.com & email = shikharebs@rediffmail.com & bhushanshikhare@gmail.com

## ~~~~~ अमृतकुंभ आख्यान ~~~~~

*पुरा प्रवृत्ते देवानाम् देत्वैसह महारणे । समुद्रमंथनात्प्राप्तं सुधाकुंभ तदा सुरै: ।।*
*तस्मात्कुंभात्समुत्पन्न: सुधाबिंदु महीतले । यत्रयत्रापनत तत्र कुंभपर्वं प्रकिर्तित: ।।*

**(स्कंदमहापुराण)**

**ज्या**सुखासाठी सर्व जग प्रयत्न करीत आहे,त्यासुखाची राखरांगोळी करणारा मृत्यु कोणास प्रिय वाटेल? अशामृत्युपासून सुटका करून घेण्यासाठी जगत् उत्पत्ती पासून मानव काही उपाय शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. देव मानवापेक्षा श्रेष्ठ म्हणुन ते मरणाधीन नसणार व ते अमर असण्याचे कारण अमर करणारी वस्तु त्याचेजवळ आहे.ती वस्तु म्हणजेच "**अमृत**" . हा शब्द वैदिक वाङमयात अनेक ठिकाणी आलेला आहे.या अमृताचे उत्पत्तिची कथा अशी.

**कृ**तयुगात एकदा ऐरावतावर बसलेल्या **इंद्रास** पाहुन संतुष्ट झालेल्या "**दुर्वास**" ऋषींनी आपल्या गळ्यातील माळ काढुन प्रसाद म्हणुन इंद्रास अर्पण केली,पण इंद्राने तात्काळ तिचा स्वीकार न केल्याने ती माळ खाली पडली व ऐरावताच्या पायाखाली तुडवली गेली. त्यामाळेची अवस्था पाहुन अत्यंत क्रुध्द झालेल्या ऋषींनी इंद्रास तुझे ऐश्वर्य व इंद्रपद नष्ट होईल,असा शाप दिला.त्यामुळे इंद्र व सर्व देवांचे सामर्थ नष्ट होऊन हतवीर्य झालेल्या देवांना दानवांकडुन वारंवार पराभव पत्कारावा लागला. त्यावेळी दैत्याचा राजा "**त्रिपुरासुर**" राज्य करीत होता.तेव्हा ब्रम्हदेवासह सर्व देवतागण "**विष्णु**" देवास शरण गेले असता,श्री विष्णुंनी त्यांना सांगितले की,तुम्ही दैत्यांशी समझोता करून त्यांच्या मदतीने "**समुद्रमंथन**" करा.त्यातुन तुम्हास अमृताची प्राप्ति होईल आणि अमृताच्या प्राशनाने तुम्हास अमरत्व प्राप्त होऊन तुम्ही दैत्यांकडुन पराजित होणार नाही. विष्णुंची युक्ति सर्व देवांना पसंत पडली.लागलीच सर्व देव त्रिपुरासुराकडे गेले आणि समुद्रमंथनाची कल्पना त्याचे पुढे मांडली. त्रिपुरासुराने समुद्रमंथनातुन निघणारे अमृत अर्धे आम्हास दिले पाहिजे ह्या अटीवर समुद्रमंथनास येण्याचे कबुल केले.तद्नंतर देव व दानवांनी मिळुन "**मंदार**" नावाचा पर्वत उचलुन क्षीरसागराजवळ आणला व दोर म्हणुन "**वासुकी**" सर्पास अमृताचा वाटा देण्याचे कबुल करून आणण्यात आले व त्याचा मंदारचलाला वेढा देण्यास आला. शेपटीकडील बाजुस देव व तोंडाकडुन दानव असे धरून समुद्रमंथनास आरंभ केला. परंतु मंदारचलास खाली आधार नसल्याने तो जड होऊ लागला. तेव्हा श्री विष्णुनीं कासवाचे रुप (*कुर्मावतार*) धारण करून मंदारचलाला खालून आधार दिला. मग समुद्रमंथनाचे कार्य सुरळीत सुरू झाले. या समुद्रमंथनातून खालील रत्ने निघाली ती पुढिल प्रमाणे ~~~~~

*लक्ष्मी: कौस्तुभपारिजातकसुरा धनवंतरीश्चंद्रमा। गाव: कामदुधा: सुरेश्वरगणो रंभादिदेवांगना ।।*
*अश्वसप्तमुख: सुधा हरिधनु: शंखो विषंचांबुधे। रत्नानिती चतुद्रशं प्रतिदिनं कुर्वन्तु वै मंगलम् ।।*

**या** इतर रत्नांबरोबरच "**श्री धन्वंतरी**" हातात अमृताचा कलश घेऊन आलेले पाहाताच देवांनी दैत्यापासून त्याचे संरक्षण करण्यासाठी भगवान विष्णुंचे संकेतानुसार देवगुरू बृहस्पतींच्या देखरेखीखाली इंद्रपुत्र "**जयंत**" याने तो कलश हस्तगत केला व कुंभाचे संरक्षणासाठी भगवान "**चंद्राची**" नियुक्ती करण्यात आली. दानवांनी देवांचा पाठलाग सुरू केला. देव अमृतकलश घेऊन **स्वर्ग,मृत्युलोक** व **पाताळ** या तीनही लोंकात हिंडले. त्यापैकी मृत्युलोकी

देवांचे बारा दिवस म्हणजे मानवाची बारा वर्षे होतात. या अवधीत देवांनी तो कुंभ चार ठिकाणी ठेवले होते,ते स्थान म्हणजे "**हरिद्वार**" ,"**प्रयाग**" ,"**त्र्यंबकेश्वर**" ,"**उज्जैन** " .तो पूर्णकुंभ ठेवतांना व उचलतांना काही अमृताचे थेंब येथे सांडले. तेव्हापासून या चार स्थानांनाच अमृतक्षेत्र मानून अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले.या पौराणीक कथेचा विचार करता वाचकांच्या हे लक्षात येईल की,"**सिंहस्थ कुंभमेळा**" श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वरीच भरतो.कारण ज्यावेळेस समुद्रमंथन झाले,त्यावेळी सत्ययुग होते आणि मंदारचलाला आधार देण्यासाठी श्री विष्णुंनी कुर्मावतार धारण केला होता तसेच गंगावतरण ही घटना देखिल याच काळाततीलच. सध्या प्रचलित असलेले नासिक क्षेत्र हे प्रभु श्री रामचंद्र वनवासात पंचवटीत रहात होते म्हणुन प्रसिध्द झाले,ही घटना व्दापार युगातील आहे.(*मागील भागात दिलेल्या सत्यकथे वरुन एवढेच सिध्द होते की,सत्ययुगापासून व्दापारयुगापर्यंत सिंहस्थ कुंभमेळा श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथेच भरत होता . पितळ जरी पिवळे दिसत असले तरी त्यास सोन्याची किंमत येत नाही.*) म्हणुनच सर्व पातकांपासून मुक्त होऊन अमृतप्राप्तिने अध्यात्मिक ज्ञानाकडे प्रवृत्त होण्यासाठी चिद्रसात परिप्लुत मूल गोदावरीत स्नान करण्यासाठी "**तीर्थराज कुशावर्तवरच**" यावे.

## ~~~~~ इति शुभं भवतु ~~~~~

---

# ~~~~~ अशी अवतरली गंगा गोदावरी ~~~~~

*कृते लक्षव्दयातीते मांधतरी शके सति । कूर्मेचैवतारेच तथा सिंहगते गुरु* ।।१।।
*माघ शुक्ल दशम्याच माध्यान्हे सौम्यवासरे । गंगा समागता भूमौ गौतम प्रार्थिता सति* ।।२।।

**कृ**तयुगात मांधाता शक चालू असतांना गुरू सिंह राशित असून माघ मासातील दशमीस माध्यान्हि "**कलिमलहारिणी**" गंगा(*गोदावरी*) ऋषि गौतमांच्या प्रार्थनेने पृथ्वितलावर अवतीर्ण झाली. या गौतमी गंगेच्या उत्पत्ती संबंधी असलेली पौराणिक कथा थोडक्यात पुढीलप्रमाणे ~~~~~

**त्रि**संध्या क्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वराच्या परिसरात पूर्वी ''**शारद्वकुलात**''जन्मलेले "**गौतम**" नावाचे ऋषि निवास करीत होते. त्यांच्या पत्निचे नाव "**अहिल्या**" होते. त्यांच्या अतिव तपश्चर्येमुळे व सेवाधर्माच्या वाढत्या पुण्याईने देवराज इंद्राला पदच्युत होण्याची भिती निर्माण झाली. त्याने कारस्थान करून गौतमाला गोहत्येचे पातक घडविले. शंकराचे जटाजूटातील पापहारिणी गंगेच्या पवित्र जलाने स्नान केल्यावाचून या पातकापासून मुक्ति मिळणार नाही,असा निर्णय तत्कालिन सर्व ऋषिंनी दिला. तेव्हा या गौतमऋषिंनी सपत्निक ब्रम्हगिरि पर्वतावर बारा वर्षे घोर तपश्चर्या करून भगवान रूद्रास(*शंकरास*) प्रसन्न करून घेतले आणि आपल्या जटेतील गंगा गोहत्येच्या पातकापासून मुक्त होण्यासाठी मजला द्यावी,असा वर मागितला. तेव्हा शंकराने गंगेस भूमण्डळी जाण्यास सांगितले,परंतु गंगा भूतलावर जाण्यास तयार होईना.तेव्हा शंकराने रागाने आपल्या जटा आपटुन गंगेचा त्याग केला.(*हे स्थान अद्याप सुस्थितीत आहे व ते स्थान अद्याप दाखविले जाते.*)त्यामुळे गंगेस पृथ्विवर येणे भाग पडले. गंगामातेने मानवी स्वरूप धारण करून शंकरांस विनंती केली की, गौतम ऋषिंना गोहत्येच्या पातकापासुन मुक्त करणे हे माझे भूमण्डळी अवतिर्ण होण्याचे कारण आहे तर तेव्हा कार्य पूर्ण झाल्यावर मी येथुन निघुन जाईल,आणि जर सर्व मानवांच्या उध्दारा करिता मी भूमण्डळी कायम वास्तव्य करावे असे आणपास वाटत असेल तर माझे उगमस्थानी सर्व पवित्र नद्या,तीर्थे व देवता यांनी सिंह राशीत गुरू आला असता १३(*तेरा*) महिने वास्तव्यास आले पाहीजे व त्याच प्रमाणे अग्रपुजेचा मान मलाच मिळाला पाहिजे,अशी अट घातली. हीअट सर्वांनी मान्य केली. तेव्हा पासून गंगा प्रवाह रूपाने वाहू लागली. त्यावेळेपासुनच श्री क्षेत्र **त्र्यंबकेश्वरी** सिंहस्थ कुंभमेळा सुरू झाला.

**त्या**चप्रमाणे ब्रम्हगिरि पर्वतावर औदुंबराचे मूळापासून गौतमी गंगेचा प्रवाह सुरू झाला. परंतु गौतम ऋषिंना स्नान होईना. तेव्हा पर्वताच्या पायथ्याशी जेथे गंगेचा ओघ प्रथम दृष्टिस पडला तेथे त्यांनी अभिमंत्रित दर्भांनी गंगेचा ओघ अडवून स्नान केले. म्हणूनच या तीर्थास "**कुशावर्त**"(*कुशै: आर्वत: इति*) ही संज्ञा प्राप्त झाली. हेच तीर्थराज कुशावर्तच गोदावरीच्या प्रवाहाचे आरंभ स्थान आहे.

---

# ~~~~~ तीर्थराज कुशावर्त ~~~~~

*कुशेनावर्तिता गंगा गौतमेन महात्मना । कुशावर्तमिती ख्यातं त्रिषु लोकेषु विश्रुतम् ।।*

**कु**शावर्त हे परम पवित्र तीर्थ त्र्यंबकेश्वर गावाच्या मध्यभागी आहे. शास्त्रीय आधारानुसार ज्यांस चार कोन असतात त्यास "**तीर्थ**" तर ज्यांस सहा कोन असतात त्यांस "**तीर्थराज**" अशी संज्ञा दिली जाते,त्यामुळे कुशावर्त तीर्थास "**तीर्थराज**" असे म्हणतात. या परम पवित्र तीर्थाची बांधनी हेमाडपंथी पध्दतीची आहे. तीर्थाच्या सभोवती दक्षिण,पश्चिम व उत्तर दिशांना साधारण चार उंचीच्या ओव-या बांधलेल्या आहेत. या ओव-याच्या बाजुने मजबुत कोटाने वेष्टित आहेत. बाह्यभागावर गंगावतरणाचे वेळी ज्या देवता,ऋषी व ऋषीपत्नी कार्यान्वित होत्या,त्याची शिल्प व भरपूर नक्षीकाम आहे. आग्नेय्य कोनास शिवालय,नैऋत्य कोनास गणपतीची भव्य मूर्ती आहे. प्रत्यक्ष तीर्थात तळा-पर्यंत साधारण दीड फुटी पाय-या असून नैऋत्य दिशेकडुन खडकातुन गंगेचा प्रवाह येतो. या तीर्थापासून या गौतमी गंगेस "**गोदावरी**" हे नामाभिधान प्राप्त झाले. कारण "**गोदा**" या शब्दाचा अर्थ असा होतो,

" *गौतमस्य गां जीवन ददाति इति गोदा* "

**गौ**तम ऋषींना गोहत्येच्या पातकापासून मुक्त करून गाईस जीवनदान देणारी म्हणुन ही नदी गोदावरी म्हणुन ओळखली जाते. या गौतमी गंगेच्या यात्रेच्या निमित्ताने शास्त्रकारांनी या तीर्थराज कुशावर्तास अग्रपुजेचा मान दिला आहे कारण ~~~~~

*त्रिकंटके शोभामान् त्र्यंबकं नामनात: । तत्र तीर्थं कुशावर्त त्रिषु लोकेशु विश्रुतम् ।।*

**अ**से हे कुशावर्त तीर्थ वरील श्लोकात सांगितल्याप्रमाणे तीनही लोकात प्रसिध्द आहे.म्हणुनच या तीर्थाबद्दल "**त्वं राजा सर्वतीर्थानाम्**" असे लिहिलेले आहे. ज्याप्रमाणे कुरूक्षेत्रातील "**शर्यणावत**" तीर्थात स्नान केले असता त्या तीर्थातील सोम अमृतांश मानवास मिळतो. त्याप्रमाणे सिंह राशीत गुरू आला असता तीर्थराज कुशावर्तातील गंगेचे पवित्रजल चिद्रसात परिप्लुत होते. या तीर्थात सिंहस्थ पर्वकाली स्नान--दान केले असता मनुष्य सर्व पापांपासुन मुक्त होऊन अध्यात्मज्ञानाकडे प्रवृत्त होतो,जसे

*कुशावर्त महातीर्थं रूपं यच्चिद्रसोज्ज्वलम् । तस्य स्नानात चिन्मयोभूत्वा रूपवान शिव एव स: ।।*

**रा**मायणातील उल्लेखाप्रमाणे प्राचिन काली प्रभु रामचंद्रांनी कुशावर्त तीर्थावर सिंहस्थकाळात येवून यथाविधी यात्रा केली,हा इतिहास पुढे थोडक्यात देत आहे तो असा की,

**ज्या**वेळी श्री प्रभु रामचंद्र वनवासात असतांना काही काळ पंचवटी(नाशिक) येथे वास्तव्य करीत असतांना आपले पिता दशरथ स्वर्गवासी झाले अशी बातमी प्राप्त झाल्याने शोक करीत असता एके दिवशी प्रभु रामचंद्रांच्या स्वप्नात राजा दशरथाने येवून सांगितले की,"*मला अद्याप उत्तम गति मिळाली नाही,तेव्हा मला उत्तम गति मिळण्यासाठी तु प्रयत्न कर*" तेव्हा प्रभु रामचंद्रांनी जवळ रहात असलेल्या "**कश्यप**" ऋषिंच्या आश्रमात जाऊन आपल्याला पडलेल्या स्वप्नात झालेल्या दृष्टांत सांगितला. तेव्हा कश्यपांनी प्रभु रामचंद्रास असा उपदेश केला की,

*सिंहस्थेच सुरगुरौ दुर्लभं गौतमी जलम् । यत्रकुत्रापि राजेंद्र कुशावर्त विशेषत: ।।*
*तवभाग्येन निकटे वर्तते ब्रम्हभूधर: । सिंहस्थो पि समायात: तत्र गत्या सुखीभव ।।*
*सिंहस्थेतु समायाते राम: कश्यप संयुत: । त्र्यंबकक्षेत्र मागत्य तीर्थयात्रां चकार ह ।।*

(**स्कंदमहापुराण**)

**अ**र्थात,"*सध्या सिंहस्थ पर्वकाल चालु आहे,तेव्हा हे रामचंद्रा तु त्र्यंबकेश्वरी जाऊन तीर्थराज कुशावर्तावर यथा विधी तीर्थयात्रा कर त्या पुण्याईने दशरथास उत्तम गति प्राप्त होईल आणि तुझे सर्व मनोरथ सफल होईल* " असे सांगुन कश्यप ऋषी प्रभु रामचंद्राना घेऊन सिंहस्थ काळात त्र्यंबकेश्वरी आले व श्री रामचंद्रांकडुन यथाविधी सिंहस्थ यात्रा केली.त्यामुळे दशरथ राजास उत्तम गती प्राप्त झाली असा उल्लेख प्राचिन "**स्कंदमहापुराणात**" केलेला आहे.

---

# ~~~~~ सिंहस्थ कुंभपर्व शाहीस्नानाचे आखाडे ~~~~~

**श्री** क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे गोदावरीचे तीर्थराज कुशावर्त हे प्रसिध्द तीर्थ आहे. येथुनच पुढे गोदावरी नदी रूपाने वहाते. येथेच पूर्वी महर्षी गौतमांचा आश्रम होता. जगत्गुरू आद्य श्री शंकराचार्यांचेही येथे स्थान आहे. महाकुंभ पर्वाचे वेळी येथे शाहीस्नाकरीता येणारे दसनाम संन्यासी आदी साधुंचे व महंतांचे आखाडे आहेत. त्यांचा परिचय - संन्यासी दशनाम यांच्यात तीर्थ,आश्रम,सरस्वती,भारती,गीरी,पुरी,वन,पर्वत आणि सागर हे होत.फार पूर्वी यांची एकत्र अशी संघटना होती मात्र कालांतराने त्यांच्यात मतभेद होऊन आखाडे रूपाने त्यांची विभागणी झाली ती पुढील त-हेने

१) **श्री निरंजनी आखाडा**--- हा आखाडा संवत ९६०,सन ८२६ मध्ये सोमवार रोजी **मांडवी**(*कच्छ*) येथे स्थापना झाला. यांचे इष्ट दैवत "**कार्तिकस्वामि**" आहे. यांच्यात नियमबध्द नागे,साधु महंत व महामंडलेश्वर यांची संख्या मोठी आहे.यांच्या शाखा **प्रयाग**(*अलाहाबाद*), **हरिव्दार**, **उज्जैन** व **त्र्यंबकेश्वर** तसेच **ओंकारेश्वर**, **उदयपूर** व **ज्वालामुखी** येथे आहेत. यांचे स्नान पहाटेच असते.

२) **श्री जुनादत्त(*भैरव*) आखाडा**--- हा आखाडा संवत १२०२,सन १०६९ मध्ये कार्तिक शुध्द दशमीस **कर्णप्रयाग** येथे स्थापन झाला. यांचे इष्टदेव "**श्री रूद्रावतार दत्तात्रय**" यांच्यात नियमबध्द नागे,साधु,महंत व महामंडलेश्वर यांची संख्या मोठी आहे. तसेच यांच्यात अवधुतानिया पण असतात.यांच्या शाखा **प्रयाग**, **हरिव्दार**, **उज्जैन**, **त्र्यंबकेश्वर** **काशी** व **ओंकारेश्वर** येथे आहेत. यांचे स्नान पहाटेच असते.

३) **श्री महानिर्विणी आखाडा**--- हा आखाडा संवत ८०५,सन ६७१ मध्ये मार्गशीर्ष शुध्द दशमीस **झारखंड वैजनाथ धाम** (बिहार) प्रांत येथे स्थापन झाला. यांचे इष्टदेव "**श्री कपिल महामुनी**" आहेत. यांच्यात नियमबध्द नागे,साधु, महंत व महामंडलेश्वर यांची संख्या मोठी आहे.यांच्या शाखा **प्रयाग**, **हरिव्दार**, **उज्जैन**, **त्र्यंबकेश्वर**, **ओंकारेश्वर** व **कनखल** येथे आहेत. यांचे स्नान पहाटेच असते.

४) **श्री अटल आखाडा**--- हा आखाडा संवत ७०३,सन ५६९ मध्ये मार्गशीर्ष शुध्द चतुर्थीस **गोंडवन** येथे स्थापन झाला. यांचे इष्टदेव "**श्री गजानन**"(*गणपती*) आहेत. यांच्यातही नियमबध्द नागे,साधु,महंत व महामंडलेश्वर यांची मोठी संख्या असते. यांच्या शाखा **प्रयाग**, **हरिव्दार**, **उज्जैन**, **त्र्यंबकेश्वर**, **काशि**, **आजर** व **बडोदा** येथे आहेत. यांचे स्नान पहाटेच असते.

५) **श्री आवाहन आखाडा**--- हा आखाडा संवत ६०३,सन ४६९ ज्येष्ठ शुध्द नवमीस स्थापन झाला. यांचे इष्टदेव श्री "**दत्तात्रेय**"व "**गजानन**" आहेत. हा आखाडा जुना दत्त आखाडा बरोबरच असतो. यांचे केद्र स्थान "**काशी**" आहे. यांच्या शाखा **प्रयाग**, **हरिव्दार**, **उज्जैन** व **त्र्यंबकेश्वर** येथे आहेत. यांचेही स्नान पहाटेच असते.

६) **श्री आनंद आखाडा**--- हा आखाडा संवत ९१२,सन ७७८ मध्ये स्थापन झाला. यांचे इष्टदेव "**श्री अग्नि**" व "**श्री सूर्यनारायण**" आहेत. हा आखाडा निरंजनी आखाडा बरोबरच असतो. यांच्यातही नियमबध्द नागे, साधु, महंत व महामंडलेश्वर यांची मोठी संख्या असते. यांच्या शाखा **प्रयाग**, **हरिव्दार**, **उज्जैन**, **त्र्यंबकेश्वर** येथे आहेत. यांचेही स्नान पहाटेच असते.

७) **श्री पंच अग्नि आखाडा**--- हा आखाडा सन १०५८ मध्ये आषाढ शुध्द एकादशीस स्थापन झाला.यांची इष्टदेवता "**गायत्री**" आहे. यांचे प्रधान केद्र स्थान "**काशी**" आहे. यांच्यात चारही पीठांचे शंकराचार्य, ब्रम्हचारी, साधु व महामंडलेश्वर यांची मोठी संख्या आहेत. यांच्या शाखा **प्रयाग**, **हरिव्दार**, **उज्जैन**, **त्र्यंबकेश्वर** येथे आहेत. यांचेही स्नान पहाटेच असते.

८) **श्री नाथपंथी गोरक्षनाथ आखाडा**--- हा आखाडा संवत ९००,सन ८६६ मध्ये त्र्यंबकेश्वरी **अहिल्या-गोदावरीच्या** संगमावर स्थापन झाला. यांचे संस्थापक **पीर गरिबनाथ** व **पीर शिवनाथजी** आहेत. यांचे मुख्य दैवत "**गोरक्षनाथ**" असून यांच्यात बारा पंथ आहेत. हा सांप्रदाय **योगिनी कौल** नावाने प्रसिध्द आहे. यांची त्र्यंबकेश्वर येथिल शाखा "**त्र्यंबक मठिका**" नावाने प्रसिध्द आहे. या शिवाय **राजामठकद्री**(*म्हैसूर*) येथेही शाखा आहे. यांचे त्र्यंबकेश्वरी एकच स्नान असते,ते फक्त "**नागपंचमीस**" असते.(*पुढिल दिलेल्या तीन स्नानांशी त्यांचा काही संबंध नाही.*)

९) **श्री वैष्णव आखाडा**--- हा बालानंद आखाडा संवत १७२९,सन १५९५ मध्ये दारागंज येथे "**श्री मध्यमुरारी**"

यांनी यांनी स्थापन केला. कालांतराने यांच्यात **निर्मोही, निर्वाणी, खाकी** आदी तीन सांप्रदाय झाले.यांचे शाही स्नान संन्याशी दशनामी साधुंचे स्नान झाल्यावर होते. यांचा त्र्यंबकेश्वर येथे आखाडा मारुती मंदिराजवळ होता. सन १८४८ पर्यंत यांचे स्नान शाही स्नान त्र्यंबकेश्वरीच होत असे. पण सन १८४८ मध्ये **"शैव"**व **"वैष्णव"** यांचेपैकी आधी स्नान कोणाचे ह्या मुद्या वरून असे काही भांडण झाले की, १८००० च्यावर साधुंची अक्षरश: कत्तल झाली. त्यामुळे अखेर पेशव्यांना मध्यस्थता करून वाद मिटवावा लागला. त्यावेळी त्यांनी त्र्यंबकेश्वरा जवळील **"चक्रतीर्थावर"** स्नान केले. कालांतराने म्हणजे १९३२ पासुन ते नाशिक येथे करू लागले. आजही ते त्याच ठिकाणी म्हणजे नाशिक येथेच स्नान करतात. (*म्हणुन त्यावेळेपासूनच नाशिक येथे कुंभमेळा सुरु झाला. त्यामुळे अफवा ती अफवाच व खरे ते शेवटी खरेच. त्यामुळे खरे सांगळ्यासाठी ढोल बडवावा लागत नाही. सुज्ञ व्यक्तिनी स्वत:च ठरवून स्वत:च निर्णय घ्यावा हेच योग्य व तेच उत्तम.*)

१०) **श्री उदासिन पंचायती बडा आखाडा**--- हा आखाडा संवत १८४४,सन १७१० मध्ये स्थापन झाला. या सांप्रदायाचे संस्थापक श्री चंद्रआचार्य उदासिन होते. यांच्यात सांप्रदायीक भेद आहेत. यांच्यात उदासिन साधु, महंत व महामंडलेश्वर यांची संख्या मोठी आहे. यांच्या शाखा प्रयाग, हरिव्दार, उज्जैन, त्र्यंबकेश्वर, भदैनी,कनखल, साहेबगंज मुलतान, नेपाळ व मद्रास(चेन्नई) येथे आहेत. यांचे शाही स्नान सूर्योदयानंतर असते.

११) **श्री उदासिन नया आखाडा**--- हा आखाडा संवत १९०२,सन १७६८ मध्ये स्थापन झाला. वरील बडा उदासिन आखाड्या पैकीच काही साधुंनी विभक्त होऊन स्थापन केला. यांचे प्रवर्तक **"महंत सुरदासजी"** होते. यांच्यात नया उदासिन आखाड्याचे सांप्रदायी साधु, महंत व महामंडलेश्वर यांची संख्या मोठी आहे. यांच्या शाखा प्रयाग, हरिव्दार, उज्जैन, त्र्यंबकेश्वर येथे आहेत. यांचे शाही स्नान सूर्योदयानंतर असते.

१२) **श्री निर्मल पंचायती आखाडा**---हा आखाडा संवत १९१८,सन १७८४ मध्ये स्थापन झाला. १७८४ मध्ये हरिव्दार कुंभाच्यावेळी एक मोठी सभा घेऊन विचार विनिमय करून **"श्री दुरगाहसिंह महाराज"** यांनी स्थापना केली. त्याचे इष्टदेव **"श्री गुरूनानक ग्रंथसाहेब"** आहेत.यांच्यात सांप्रदायी साधु, महंत व महामंडलेश्वर यांची संख्या मोठी आहे. यांच्या शाखा प्रयाग, हरिव्दार, उज्जैन, त्र्यंबकेश्वर येथे आहेत. यांचे शाही वरिल उदासिन आखाड्यांचे शाही स्नान झाल्यावर सर्वात शेवटी असते.

---

## ~~~~~अमृतकुंभ पर्वाचे शास्त्रीय व वैज्ञानिक महत्व~~~~~

सृष्टिचमत्काराची कारणे समजुन घेण्याची जिज्ञासा तृप्त करणारी जी नानाविध शास्त्रे अलौकिक बुध्दिमान महर्षिंनी आपणास उपलब्ध करून दिली आहेत. त्यासर्वात **"ज्योतिषशास्त्र"** हे प्रमुख होय. कारण सृष्टितील प्रत्येक वस्तुमात्राची उत्पत्ति,स्थिती आणि लय ही सर्वस्वी ज्या कालाच्या अधिन आहेत अशा त्या कालाची इच्छा या ज्योतिषशास्त्राचा उत्तम उगम आमच्या या भारतवर्षातच झाला आणि आज वैभव शिखरावर आरूढ असलेली जी राष्ट्रे या शास्त्राच्या संशोषनाचा डौल मिरवित आहेत,त्या राष्ट्रांना हे शास्त्र भारतातूनच ज्ञात झाले. वैज्ञानिक युगात विज्ञानाला चंद्रावर झेप घेतांना ज्योतिष व खगोलशास्त्राची सांगड घातल्याविना पर्याय नव्हता. अहर्निश वैज्ञानिक प्रगतीच्या मागे धावणा-या मानवी मनास ऐहिक सुखासाठी अध्यात्म व ज्यातिष यांचा आधार घेऊनच सुख-शांति संपादन करता येते. प्राचिन महर्षिंनी या सर्व गोष्टिंचा दुरदर्शीपणाने विचार करून शास्त्र व ज्योतिष यांची सांगड घातली. अनादिकालापासुन चालत आलेल्या भारतातील ख्यातनाम **हरिव्दार**,**प्रयाग**,**उज्जैन** व **त्र्यंबकेश्वर** या चार पवित्र कुंभक्षेत्रांना ज्योतिषसुत्राच्या आधारेच श्रेष्ठता प्राप्त झाली. अन्यथा श्री क्षेत्र **"त्र्यंबकेश्वर"** पासून **"राजमहेंद्री"**पर्यंत वाहणा-या या गोदावरीच्या काठावर कोठेही कुंभमेळे भरले असते. श्रध्देच्या कुंभात ज्योतिषशास्त्राचे ज्ञानामृत साठविलेल्या श्री क्षेत्र त्र्यंबश्वरच्या अमृतकुंभाचे विवेचन असंख्य भाविकांच्या सेवेत रूजु करित आहोत.

*पुरा प्रवृत्ते देवानाम् दानव्यैसह महारणे । समुद्रमंथानात्प्राप्तम् सुधाकुंभ तदा सुरे: ।।*
*तस्मात्कुंभात्समुत्पन्न: सुधाबिंदु महीतले । यत्रयत्रापनत तत्र कुंभपर्व प्रकिर्तित: ।।*

(**स्कंदमहापुराण**)

**अ**मृतमंथनातून मिळालेला अमृतकुंभ आपल्याला मिळावा म्हणुन देव-दानवांनी जो संघर्ष केला,त्या संघर्षात त्यांनी तो कुंभ जेथे जेथे ठेवला तेथे तेथे त्यातील अमृतबिंदु पडले व ती स्थाने अमृतमय होऊन कुंभमेळ्याची क्षेत्रे ठरली, त्या स्थानी ज्या योगावर कुंभमेळा भरतो त्याबद्दलची शास्त्रवचने पुढिलप्रमाणे,

*पृथित्य: कुंभयोगस्य चतुर्धा भेद उच्यते । गंगाव्दारे प्रयागेच धारा गोदावरी तटे ।।*

अर्थ--- पृथ्विवरिल चारच पवित्र कुंभक्षेत्रे **हरिव्दार**,**प्रयाग**,**उज्जैन** व **त्र्यंबकेश्वर** हीच होय.

*पद्मिनीनायके मेषे कुंभराशिगते गुरौ । गंगाव्दारे भवेत योग: कुंभानामा तदोत्तम ।।*

अर्थ--- जेव्हा गुरू कुंभ राशीत असतो व सूर्य मेष राशीत जातो त्यावेळी कुंभमेळा **"हरिव्दार"** क्षेत्री होतो.

*मकरेच दिवानाशे अजकेच बृहस्पतौ । कुंभयोगो भवेत तत्र प्रयागेह्यति दुर्लभ ।।*

अर्थ-- जेव्हा गुरू मेष राशीत असून सूर्य व चंद्र तुळ राशीत येतात तेव्हा **"प्रयाग"** क्षेत्री कुंभमेळा भरतो.

*घटे सूरी: शशिसूर्य: कुह्यम दामोदरे सदा । धारायाश्च तदा कुंभो जायते खलु मुक्तिद ।।*

अर्थ--- जेव्हा गुरू सिंह राशीत व सूर्य मेषेत व चंद्र तुळेत असता **"उज्जैन"** क्षेत्री कुंभमेळा भरतो.

*सिंह गुरूस्तथा भानुश्चंद्रक्षयस्तथा । गोदावर्या तदा कुंभो जायतेवनिमण्डले ।।*

अर्थ--- जेव्हा सूर्य,चंद्र व गुरू हे सर्व एकाच राशीत म्हणजे सिंह राशीत असतात तेव्हा श्री क्षेत्र **"त्र्यंबकेश्वरी"** कुंभमेळा भरतो. हा योग श्रावण वद्य अमावास्या(*पोळा*) शके १९२६ दिनांक १३/०९/२०१५ या दिवशी येत असून त्यास **"पूर्णकुंभयोग"** असे म्हणतात.(*हे स्नान सर्वांत महत्वाचे स्नान आहे.*)

**व**रील शास्त्रसंमत विवेचनावरून सूर्यादि ग्रहांच्या राशीसंक्रमणानुसार चारही पवित्र कुंभक्षेत्रांचे लक्षात आले असेलच. आता त्र्यंबकेश्वरच्या परंपरागत स्नान पर्वांचे मुहुर्त पाहु. सन २०१५ / २०१६ च्या श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथिल कुंभपर्वात पुढिल विशेष स्नानपर्व येत आहेत.

## प्रथम शाही स्नान पर्वकाल

*घटचंद्र:सिंह भानु सिंहस्थेच बृहस्पतौ । गोदावर्या तदा कुंभो जायतेवनिम्णडले ।।*

**म**कर राशीचा चंद्र व कर्क राशी सूर्य आणि सिंह राशीचा गुरू असतांना **"प्रथम शाही स्नान पर्व योग"** आहे.हा योग श्रावण शुध्द १५(*राखी पौर्णिमा*) शके १९२६ दिनांक २९/०८/२०१५ शनिवार रोजी आहे.

## व्दितिय शाही स्नान पर्वकाल

वर दिल्याप्रमाणे ज्यास **"पूर्णकुंभयोग"** म्हणतात,त्यास **"व्दितिय शाही स्नान पर्व योग"** म्हणतात.

## तृतिय शाही स्नान पर्वकाल

*सिंह राशी गते जीवे सिंह राशीस्थिते रवौ । मीन राशी स्थितेचंद्र कुंभ पर्व भवेत् सदा ।।*

**मी**न राशीचा चंद्र. सिंह राशीचा सूर्य व सिंह राशीचाच गुरू असतांना **"तृतिय शाही स्नान पर्व योग"** असतो. हा योग भाद्रपद शुध्द १२ (*वामन व्दादशी*) शके १९२६ दिनांक २५/०९/२०१५ शुक्रवार रोजी आहे.

**या**प्रमाणे दक्षिण भारतातील म्हणजेच महाराष्ट्रातील एकमेव सिंहस्थ कुंभक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वरी जगाच्या कानाकोप-यातून असंख्य भाविक येऊन परम पवित्र तीर्थराज कुशावर्तात स्नान-दानादिक करून पुण्य करून संपादन करतात. हे फक्त वाचकांसाठी सुचित माहिती पत्रक आहे. ब-याच जणांना मनामध्ये एक अतिगैरसमज आहे की, कुंभमेळ्या मध्ये फक्त स्नानाचेच महत्व आहे. पण हे खरे नसुन खरे तर पूर्ण सिंहस्थ विधी करूनच त्याचे फल पूर्ण प्राप्त होते. वरिल तारखा फक्त साधुसाठी स्नानासाठीच्याच आहे. सामान्य माणसासाठी बाकी सर्व वर्षभर हे त्याचे महत्व आहे त्यासंदर्भात आमचेशी संपर्क साधावा. गैरसमज पसरवि-यापासुन आपण दुर रहावे, हीच नम्र विनंती.

**संकलन = भूषण सांभ शिखरे**(*पवईकर*)

---

**ह्या विधीच्या व्यतिरिक्त आम्ही वास्तुशांति,ग्रहशांति,उदकशांति,नवचंडि,शतचंडि आदी तत्सम कोणत्याही प्रकारचे धार्मिक कार्यक्रम ही आम्ही स्वत: करवून देतो. त्याचप्रमाणे त्र्यंबकेश्वरी होणारे लघुरूद्र,महारूद्र ह्यासारखे कार्यक्रम ही आम्ही सुध्दा व्यवस्थित करवून देतो.**

*************************************************************************